क्र. पोमसं/३/१०/नक्षल शिघ्र पदोन्नती/४१७/२०१४
**पोलीस महासंचालक यांचे कार्यालय.**
शहीद भगत सिंह मार्ग, कुलाबा, मुंबई-०१
दिनांक:- २० /०८/२०१४.

<u>*परिपत्रक:-*</u>

**विषय:-** नक्षलग्रस्त भागात अत्युत्कृष्ट कामगिरी करणा-या पोलीस अधिकारी / कर्मचा-यांना प्रोत्साहन म्हणुन वेगवर्धित पदोन्नती (Accelerated Promotion) देणेबाबत.

-------०-------

उपरोक्त प्रकरणी, शासन निर्णय, गृहविभाग, क्र.पीएमएन-२०१२/ ११३२/ प्र.क्र.१६५ /पोल-५ ब, दि.२० मे, २०१४ ची प्रत यासोबत पाठविली आहे.

२. खालील घटक प्रमुखांना कळविण्यात येते की, त्यांनी सदरचा शासन निर्णय, त्यांच्या अधिपत्याखालील सर्व संबंधीत पोलीस अधिकारी / कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून द्यावा. तसेच सदर शासन निर्णयातील प्रत्येक सूचनेचे घटकप्रमुखांनी काटेकोरपणे पालन करावे.

**( अतुलचंद्र कुलकर्णी )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, अॅन्टी करप्शन ब्युरो, म.राज्य, मुंबई (सस्नेह)
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म.रा.,मुंबई / (विशेष कृती), म.रा.,मुंबई / लोहमार्ग, म.रा.,मुंबई / वाहतुक, म.रा.,मुंबई/ नाहसं, म.रा.,मुंबई / द.वि.प., म.रा.,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग मुंबई सह).
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, म.रा.,पुणे.
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, फोर्स वन, मुंबई.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, वडाची वाडी, पुणे / विशेष सुरक्षा विभाग, दादर-मुंबई / नक्षल विरोधी अभियान, नागपूर.
पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, गडचिरोली.
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग सह).

पोलीस अधीक्षक, विशेष सुरक्षा विभाग, दादर-मुंबई.

सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालये/ युओटीसी, नागपूर / डीटीएस, नाशिक.

पोलीस अधीक्षक, राज्य पोलीस नियंत्रण कक्ष, म.रा.मुंबई.

प्रत सविनय सादर :-

अपर मुख्य सचिव,
महाराष्ट्र शासन, गृहविभाग, ७ वा मजला, सेंटर "वन",
जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई-०५
(लक्षवेध :- श्री.अजिंक्य बगाडे, कक्ष अधिकारी)

प्रत सस्नेह अग्रेषित :-

आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, २८ क्वीन्स गार्डन, पुणे

उपसंचालक, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समित्या, ठाणे / पुणे/ नाशिक/ औरंगाबाद नागपूर / अमरावती / नंदूरबार / गडचिरोली.

संचालक, समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य- पुणे.

उप संचालक, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समित्या, ठाणे / पुणे /नाशिक / औरंगाबाद नागपूर / अमरावती / अकोला/ लातूर / चंद्रपूर.

प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :-

पोलीस उपअधीक्षक, संगणक कक्ष, राज्य पोलीस मुख्यालय, मुंबई.
(सदरचे परिपत्रक सहपत्रांसह संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी).

कार्यासन अधिकारी, का.क्र.१, १-अ, २, २-अ, ३-अ, ४, ५, ५-अ, ६, ९, ११, ११-अ,३६ व

नक्षलग्रस्त भागात अत्युत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन म्हणून वेगवर्धित पदोन्नती (Accelerated Promotion) देणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः पीएमएन-१०१२/११३२/प्र.क्र.१६५/पोल-५ब**
जागतिक व्यापार केंद्र, सेंटर-१, कफ परेड, मुंबई-४०० ००५
तारीख: २० मे, २०१४

**प्रस्तावना**

राज्याच्या गडचिरोली, गोंदिया या जिल्ह्यांमध्ये तसेच चंद्रपूर, भंडारा जिल्ह्यांच्या काही भागात आढळून येणाऱ्या नक्षलवादी कारवायांकडे त्वरीत व गांभीर्याने लक्ष देऊन निरनिराळ्या उपाययोजना करुन नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न शासनाकडून करण्यात येत आहे. नक्षलभागामध्ये पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांचे मनोबल वाढावे व त्या भागात रिक्त पदे जास्त राहू नयेत यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्यासंदर्भात नक्षलग्रस्त क्षेत्रामध्ये खडतर कर्तव्य बजावत असताना नक्षलवाद्यांच्या विरोधात अत्यंत प्रभावी कामगिरी (उदा. पोलीस कारवाईमध्ये नक्षलवादी मारले जाणे / अटक करणे, भूसुरुंग, हत्यारे याबाबत माहितीद्वारे मुद्देमाल जप्त करणे, नक्षलवाद्यांच्या कारवायांबाबत अधिक माहिती घेऊन, जोखीम पत्करुन, पूर्वसूचना देवून त्या कारवायांना अटकाव करण्यास भरीव मदत करणे) करणाऱ्या पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या कार्यांचे मूल्यमापन संबंधित पोलीस अधीक्षक यांचेकडून करण्यात येऊन अत्युत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलीस शिपाई ते सहायक पोलीस निरीक्षक यांना लगतच्या वरिष्ठ पदावर वेगवर्धित पदोन्नती देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय**

नक्षलग्रस्त भागात नक्षलविरोधी कारवायांसंबंधात अत्युत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलीस शिपाई ते सहायक पोलीस निरीक्षक यांना लगतच्या वरिष्ठ पदावर खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून वेगवर्धित पदोन्नती देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

१. 'वेगवर्धित पदोन्नती' या योजनेची अंमलबजावणी चांगल्या प्रकारे व्हावी याकरिता या योजनेचे स्वरुप व योजनेंतर्गत मिळणारा प्रोत्साहनात्मक लाभ या बाबी सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणण्याच्या दृष्टीने खात्यांतर्गत प्रसिध्दी देण्यात यावी. त्यामध्ये "संबंधित पदधारक नक्षलग्रस्त क्षेत्रात काम करण्यास इच्छुक असल्यास, त्यांनी इच्छुकता लेखी स्वरुपात विहित कालावधीत विभाग प्रमुखांना

कळवावी. इच्छुकता कळविल्यानंतर त्यांची कोणत्याही कालावधीत नक्षलग्रस्त भागात नियुक्ती करण्यात येईल" हे स्पष्ट करण्यात यावे.

२. 'वेगवर्धित पदोन्नती' या योजनेनुसार नक्षलग्रस्त भागात काम करण्यास तयार असलेल्या प्रत्येक संवर्गातील पोलीस अधिकारी / कर्मचारी यांची इच्छुकता (willingness) घेवून इच्छुक असलेल्या कर्मचाऱ्यांपैकी सेवाज्येष्ठ असलेल्या व्यक्तींची नक्षलग्रस्त भागात नियुक्ती करण्यात यावी. त्यानंतरही नक्षलग्रस्त भागात पदे रिक्त राहत असल्यास त्या खालील सेवाकनिष्ठ अधिकारी / कर्मचारी यांचा नियुक्तीसंदर्भात विचार करण्यात यावा.

३. गट-अ व गट-ब मधील राजपत्रित पदावर पदोन्नती देताना विभागीय संवर्गवाटप नियमावली, २०१० नुसार संवर्ग वाटप करणे आवश्यक आहे. तथापि प्रस्तुतची वेगवर्धित पदोन्नती योजना ही संपूर्ण राज्यासाठी नसून केवळ नक्षलग्रस्त भागासाठीच आहे तसेच पदोन्नत होणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांना नक्षलग्रस्त भागातच पहिली नेमणूक दिली जाणार आहे. त्यामुळे या योजनेंतर्गत पदोन्नत होणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांना विभागीय संवर्ग वाटप नियमावलीच्या तरतुदीमधून अपवाद करण्यात येत आहे.

४. वेगवर्धित पदोन्नती ही फक्त नक्षलग्रस्त भागात राबविण्यात येणाऱ्या नक्षलविरोधी अभियानास लागू राहील.

५. अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या नक्षलग्रस्त भागातील नेमणूकीचा कालावधी हा फक्त २ वर्षाचा राहील. प्रसंगत: संबंधित अधिकारी / कर्मचारी यांनी संमती दिल्यास त्यांच्या नेमणूकीचा काळ दोन वर्षापेक्षा अधिक वाढविला जाऊ शकतो. सदर अधिकचा कालावधी / पदावधी पूर्ण होण्यापूर्वी बदली करावयाची असल्यास, मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ च्या कलम-२२ न मधील तरतुदींचे पालन करुन विहीत सामान्य पदावधी पूर्ण होण्यापूर्वी बदलीची कार्यवाही करण्यात यावी.

६. वेगवर्धित पदोन्नतीचा लाभ मिळणेसाठी परिवर्तीत रजा, प्रसुती रजा व असाधारण रजा वगळण्यात येतील. परंतु नैमित्तिक रजा, बदली रजा व एका वर्षातील कमाल ३० दिवस इतका अर्जित रजेचा कालावधी वगळला जाणार नाही.

७. सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक-एसआरव्ही-१०९६/प्र.क्र.१/९१/१२, दिनांक १७ फेब्रुवारी, १९९७ च्या शासन निर्णयान्वये निहित केल्यानुसार पदोन्नती देण्यापूर्वी संबधितांचा परिविक्षा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण केल्याचे आदेश काढले असणे आवश्यक आहे.

८. वेगवर्धित पदोन्नतीनंतर संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांची ज्येष्ठता ते ज्यावेळी पदोन्नत होतील त्यापूर्वी पदोन्नत झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या नंतर लावण्यात येईल.

९. पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्यांच्या विशिष्ट दर्जाच्या कामास अनसुरुन एक किंवा त्यापेक्षा जास्त वेगवर्धित पदोन्नती दिल्या जातील, परंतु एका प्रकरणात त्यांना एकच पदोन्नती दिली जाईल.

१०. वेगवर्धित पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांनी नक्षल विरोधी अभियानात विशिष्ट कामगिरी बजावली पाहिजे. उदा. ॲम्बुश (ambush), चकमक तसेच अशी गोपनीय माहिती गोळा करणे की, ज्या आधारावर दर्जेदार व परिणामकारक अभियान राबविले जाईल.

११. सदर अधिकारी / कर्मचारी यांचे सेवा अभिलेख समाधानकारक असले पाहिजेत. त्यांना त्यांच्या सेवा काळात कोणतीही मोठी शिक्षा झालेली नसावी.

१२. वेगवर्धित पदोन्नतीसाठी संबंधितास आवश्यक ते जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

१३. वेगवर्धित पदोन्नती देण्यासाठी नवीन पदे निर्माण केली जाणार नाहीत व संबंधित पदांच्या मंजूर संख्येमधूनच पदोन्नती दिली जाईल.

१४. सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक-एसआरव्ही-२००५/प्र.क्र.१/२००५/१२, दिनांक २५ फेब्रुवारी, २००५ च्या शासन परिपत्रकामधील आदेशानुसार प्रत्येक टप्प्यातील पदावर पदोन्नतीसाठी निम्न पदावर किमान ३ वर्षे नियमित सेवा (किंवा सेवा प्रवेश नियमात ३ वर्षापेक्षा जास्त कालावधी विहित केला असल्यास तेवढी वर्षे किमान सेवा) कालावधी पूर्ण करणे आवश्यक आहे. तथापि वेगवर्धित पदोन्नतीसाठी निम्न पदावर २ वर्षे सेवा होणे आवश्यक राहील.

१५. वेगवर्धित पदोन्नतीबाबत संबंधित संवर्गाच्या सेवाप्रवेश नियमात योग्य त्या सुधारणा स्वतंत्रपणे करण्यात येतील.

१६. वेगवर्धित पदोन्नती ही फक्त नक्षलग्रस्त भागात राबविण्यात येणाऱ्या नक्षलविरोधी अभियानास लागू असल्याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील पदांवर होणाऱ्या पदोन्नतीच्या अनुषंगाने प्रस्तावास शासनाची व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची मान्यता आवश्यक राहणार नाही.

१७. पदोन्नतीनंतर संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांची वेतननिश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ च्या नियम-११ मधील तरतुदीनुसार तसेच शासन अधिसूचना, वित्त विभाग क्रमांक-वेपुर-१२०९/प्र.क्र.२७/सेवा-९, दिनांक २२ एप्रिल, २००९ मधील परिच्छेद-१३ अन्वये करणे आवश्यक राहील.

१८. सदर योजनेचे वेळोवेळी नियमित मुल्यमापन करण्यात येईल व अशी वेगवर्धित पदोन्नती सरसकट / अधिक प्रमाणात दिली जाणार नाही व या योजनेच्या आकर्षणामुळे अनुचित प्रकार घडणार नाही याची पूर्णपणे दक्षता घेणे आवश्यक राहील.

२. वेगवर्धित पदोन्नती ही विभागीय पदोन्नती समितीच्या कक्षेतून वगळण्यात येत असून त्यासाठी खालील प्रमाणे समिती असेल -

अ) पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक पदापर्यंतच्या वेगवर्धित पदोन्नतीसाठी समिती

१) पोलीस महानिरीक्षक (न.वि.अ.), महाराष्ट्र राज्य, नागपूर -- अध्यक्ष
२) पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, नागपूर -- सदस्य
३) प्राचार्य, अपारंपारिक अभियान प्रशिक्षण केंद्र, नागपूर -- सदस्य
४) पोलीस अधीक्षक (विशेष कृती दल), नागपूर -- सदस्य

ज्या घटकातील अधिकारी / कर्मचाऱ्यांनी वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी बजाविली असेल त्या घटक प्रमुखांनी दिलेल्या प्रारुपामध्ये (विहित नमुन्यात) संबधित अधिकारी / कर्मचाऱ्यांबाबतचा अहवाल परिक्षेत्रीय पोलीस उपमहानिरीक्षक / पोलीस महानिरीक्षक किंवा तत्सम अधिकारी यांच्या मार्फतीने पोलीस महानिरीक्षक (नक्षल विरोधी अभियान), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना पाठवावा.

ब) पोलीस उपनिरीक्षक ते सहायक पोलीस निरीक्षक पदापर्यंतच्या वेगवर्धित पदोन्नतीसाठी समिती

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई --- अध्यक्ष

२) अपर पोलीस महासंचालक (विशेष कृती) --- सदस्य

३) अपर पोलीस महासंचालक (आस्थापना) --- सदस्य

४) आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई --- सदस्य

ज्या घटकातील अधिकारी / कर्मचाऱ्यांनी वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी बजाविली असेल त्या घटक प्रमुखांनी दिलेल्या प्रारुपामध्ये आपला अहवाल परिक्षेत्रीय पोलीस उपमहानिरीक्षक / पोलीस महानिरीक्षक किंवा तत्सम अधिकारी यांच्या मार्फत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सादर करावा.

३. हा शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक-१९१०/का-१२, दिनांक ७ ऑक्टोबर, २०१३ व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक-११७/सेवा-३ व क्रमांक-११५-अ/व्यय-७, दिनांक १५ मे, २०१४ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१४०५२०१७०२०९७२२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bajrang Digambar Umate
Digitally signed by Bajrang Digambar Umate
DN: CN = Bajrang Digambar Umate, C = IN, S = MAHARASHTRA, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = HOME
Date: 2014.05.20 18:06:42 +05'30'

ब.दि.उमाटे
शासनाचे उपसचिव, गृह विभाग

प्रत,

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

२) अपर पोलीस महासंचालक, नक्षल विरोधी अभियान, महाराष्ट्र राज्य, नागपूर

३) अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई

४) सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक

५) सर्व पोलीस आयुक्त

६) सर्व पोलीस अधिक्षक
७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ / २, मुंबई / नागपूर
८) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१ / २, मुंबई / नागपूर
९) अधिदान व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१०) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
११) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१२) कक्ष अधिकारी (कार्यासन-१२), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) कक्ष अधिकारी (सेवा-३ / व्यय-७), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) कक्ष अधिकारी, विशा-१ब, गृह विभाग
१५) निवड नस्ती / पोल-५ब